# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## मुल्य निर्धारण कर संकलन विभाग

मिळकत कर वसुली बाबत

**परिपत्रक**

घरपट्टी विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर घरपट्टी कराची आकारणी व वसूली केली जाते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ८ नियम ३९ अन्वये मिळकत कराचे देयके बजाविण्यात येते. नियम ३० अन्वये मालमत्ता कर ०१ एप्रिल व ०१ ऑक्टोबर रोजी सुरु होणा-या सहामाही हप्त्याने आगाऊ देय असतो. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० महाराष्ट्र शासनाने ३१ मे, २०१० रोजीचे अधिसूचनेद्धारे प्रसिध्द केला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार बजाविण्यात आलेले कराचे बिल मिळकतधारकांनी बिलाप्रमाणे कराची रक्कम न भरल्यास पूर्वीचे नियम ४१ मध्ये मागणी नोटीस फी आकारणेबाबत तरतूद होती. या नियमात शासनाने सुधारणा केली आहे.

**सुधारित तरतूद** – मिळकत कराचे असा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम, बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत भरावयाची असेल आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुस-या सहामाही कराची रक्कम, प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबरपूर्वी भरावयाची असेल, आणि जर, कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग याव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील

आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक